# पुणे महानगर परिवहन महामंडळ

## प्रेसनोट

## पीएमपीएमएल कडून पासकेंद्रावर कॅशलेस सुविधा

- सोमवार दिनांक २३ ऑक्टोबर २०२३ रोजी पासुन सुरुवात.
- प्रवाशी नागरिकांना पाससाठी क्यू-आर कोडद्वारे पेमेंट करता येणार.
- कॅशलेस पेमेंट सुविधेमुळे पासविक्रीच्या ज्या जुन्या सुविधा चालू आहेत त्यावर कोणताही परिणाम होणार नाही.
- पुणे महानगरपालिकेचे आयुक्त मा. श्री. विक्रम कुमार यांच्या शुभहस्ते व परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार शुभारंभ.

पुणे महानगर परिवहन महामंडळामध्ये १ ऑक्टोबर २०२३ पासुन सर्व बसेस मध्ये ई – तिकीट मशीन मध्ये तिकीट काढून कॅशलेस पेमेंट सुविधा सुरु करण्यात आली आहे. त्याला प्रवासी नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून दि. १ ऑक्टोबर २०२३ ते दि. २० ऑक्टोबर २०२३ याकालावधीत महामंडळाला रक्कम रुपये १९,४९,४००/- इतके उत्पन्न मिळाले असून ७३,७२८ तिकिटांची विक्री करण्यात आली आहे. तर ८९,३६८ प्रवाशांनी कॅशलेस (क्युआर कोड द्वारे) तिकीट काढली आहेत.

महामंडळाच्या सर्व पास केंद्रावरून विविध प्रकारच्या पासेसची विक्री केली जाते. महामंडळास महिन्यातून सरासरी पास विक्रीतून ५ कोटी रुपयाचे उत्पन्न प्राप्त होत असते तर सरासरी ६० हजार पासची विक्री होत असते. परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह यांच्या संकल्पनेतून सोमवार दिनांक २३ ऑक्टोबर २०२३ पासुन महामंडळाच्या सर्व ४० पास केंद्रावर प्रवाशी नागरिकांना पाससाठी क्यू-आर कोडद्वारे पेमेंट करता येणार आहे. पुणे महानगरपालिकेचे आयुक्त मा. श्री. विक्रम कुमार यांच्या शुभहस्ते व परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार दिनांक २३ ऑक्टोबर २०२३ रोजी शुभारंभ होणार आहे.

तरी पास काढण्यासाठी सर्व नागरिकांनी कॅशलेस सुविधेचा वापर करून पेमेंट करावे असे आवाहन पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

---

(चौकट)

<u>या पद्धतीने होणार कॅशलेस पेमेंट.</u>

१. पास केंद्रावरील सेवकास ऑनलाईन क्युआर कोडची मागणी करणे.
२. क्युआर कोड स्कॅन करून ऑनलाईन पेमेंट करणे.
३. पास केंद्रावरील सेवकांकडून पास प्राप्त करणे.

---

दि. २१/१०/२०२३.

मा. संपादक,

दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-

कामगार व जनता संपर्क अधिकारी

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.